सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandededwarta.com

## धर्मस्वातंत्र्य कायदा २८ ऑगस्टपासून लागू

मुंबई/प्रतिनिधी-बळजबरी, फसवणूक, दिशाभूल, आमिष किंवा लग्नाचे वचन देऊन होणाऱ्या धर्मांतराला आळा घालणारा महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६ २८ ऑगस्टपासून राज्यभर लागू होणार आहे. गृह विभागाने १७ ऑगस्ट रोजी अधिसूचना जारी केली.

राजपत्रातील अधिसूचनेनुसार, राज्यपालांच्या आदेशाने गृह विभागाचे उपसचिव प्रितमकुमार जावळे यांनी ही अधिसूचना जारी केली आहे. विधेयकाला विधानसभा, विधान परिषद आणि राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर आता प्रत्यक्ष अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. या कायद्यामुळे स्वेच्छेने धर्मांतर करणाऱ्याला ६० दिवस आधी सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करावा लागणार आहे.

• वर्ष २४ वे • अंक २९१ • मंगळवार दि.१८ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# अल्पवयीन अंध मुलीचा संशयास्पद मृत्यू;लैंगिक अत्याचाराच्या आरोपाने खळबळ

## देगलूरच्या निवासी अंधशाळेतील प्रकार;मुख्याध्यापकासह संबंधितांविरुद्ध पोक्सोअंतर्गत गुन्हा



**देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरातील एका निवासी अंधशाळेत शिक्षण घेणाऱ्या १७ वर्षीय अल्पवयीन अंध मुलीचा संशयास्पद मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृत्यूपूर्वी मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांकडून करण्यात आला आहे. या प्रकरणी शाळेचे मुख्याध्यापक मारोती शिंदे यांच्यासह संबंधितांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोक्सो तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.**

मृत मुलगी मूळची उदगीर येथील असून, तिची कौटुंबिक परिस्थिती हलाखीची असल्याने ती शिक्षणासाठी देगलूर येथील निवासी अंधशाळेत राहत होती. गेल्या काही दिवसांपासून तिला पोटदुखीचा त्रास होत होता. उपचार सुरू असतानाच तिची प्रकृती सातत्याने खालावत गेली आणि अखेर १७ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास तिचा मृत्यू झाला.

कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, मुलीने शाळेतील एका प्रौढ व्यक्तीकडून आपल्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे सांगितले होते. या संदर्भातील एक चित्रफीतही समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतर तिला काही औषधांच्या गोळ्या देण्यात आल्याने उलट्या, पोटदुखी आणि प्रकृती बिघडल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. या गोळ्या कोणत्या होत्या, त्या कोणी दिल्या, त्या कोणत्या कारणासाठी देण्यात आल्या आणि त्यांचा मुलीच्या प्रकृतीवर काही परिणाम झाला का, याचा तपास होणे आवश्यक आहे. प्रकृती अधिक खालावल्याने मुलीला प्रथम देगलूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर तिला शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. तेथे तिच्या आतड्यांना संसर्ग होऊन गँग्रीन झाल्याचे निदान झाल्याचे सांगण्यात येत आहे. प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले. त्यानंतर उदगीर आणि लातूर येथेही उपचारासाठी नेण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच तिचा मृत्यू झाला.

दरम्यान, मुलीच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त करत उदगीर येथील नातेवाईक तसेच सामाजिक कार्यकर्ते देगलूर पोलिस ठाण्यात दाखल झाले. निवासी शाळेत राहणाऱ्या अल्पवयीन आणि अंध विद्यार्थिनीच्या सुरक्षेची जबाबदारी शाळा प्रशासनाची असतानाही तिच्यासोबत नेमके काय घडले, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. शाळेतील शिक्षक, कर्मचारी आणि संबंधित व्यक्तींची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

मुलीच्या मृत्यूनंतर प्रकरणाचे गांभीर्य वाढले असून, तिचे लातूर येथे शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदन अहवालातून मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. लैंगिक अत्याचार झाला होता का, औषधांमुळे अथवा उपचारादरम्यान काही गुंतागुंत निर्माण झाली का, तसेच वैद्यकीय उपचारांमध्ये कोणतीही त्रुटी झाली का, या सर्व बाबी तपासाचा महत्त्वाचा भाग ठरणार आहेत.

पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून शाळेतील संबंधित व्यक्ती, व्यवस्थापन, शिक्षक व कर्मचारी यांचे जबाब नोंदविले जाण्याची शक्यता आहे. तसेच मुलीच्या उपचाराशी संबंधित वैद्यकीय कागदपत्रे, औषधांची माहिती, उपलब्ध चित्रफीत आणि इतर पुरावे तपासले जाणार पान ४ वर

# नायगावात जीएसटी विभागाची मोठी धाड

## चिद्रावारांच्या तीनही कापड दुकानांवर एकाचवेळी कारवाई

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव शहरातील प्रसिद्ध चिद्रावार कापड दुकानाच्या तीनही शाखांवर जीएसटी विभागाने एकाच वेळी धाड टाकल्याने शहरातील व्यापारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. अंदाजे ४० अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक या कारवाईत सहभागी असल्याची माहिती मिळाली आहे.

कालपासून जीएसटी विभागाच्या पथकाकडून तीनही दुकानांमधील खरेदी-विक्रीचे व्यवहार, खरेदी व विक्री किमतींमधील तफावत आणि व्यवहाराशी संबंधित कागदपत्रांची कसून तपासणी सुरू आहे. दुकानातील उपलब्ध मालाची खरेदी पक्क्या बिलावर झाली आहे की कच्च्या बिलावर, यासह विविध बाबींची पडताळणी केली जात असल्याची माहिती आहे.एकाच वेळी तीनही शाखांवर कारवाई झाल्याने नायगावच्या व्यापारी क्षेत्रात चर्चेला उधाण आले आहे. या तपासणीमुळे शहरातील इतर व्यावसायिकांमध्येही हालचाली वाढल्या असून, काही व्यावसायिकांनी आपली दुकाने बंद ठेवल्याचे दिसून येत आहे.ही कारवाई आणखी किमान तीन दिवस सुरू राहण्याची शक्यता असल्याचे समजते. मात्र, जीएसटी विभागाच्या तपासणीत नेमके काय आढळून आले, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.तपासणी करणाऱ्या जीएसटी विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, कार्यवाही पूर्ण झाल्याशिवाय याबाबत कोणतीही माहिती देता येणार नाही, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, या मोठ्या कारवाईतून नेमके काय समोर येणार, कोणते व्यवहार किंवा कागदपत्रे तपासणीच्या केंद्रस्थानी आहेत आणि कारवाईनंतर जीएसटी विभागाकडून काय निर्णय घेतला जातो, याकडे नायगावसह परिसरातील व्यापारी वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# गावठी पिस्टल बाळगणाऱ्या तरुणास अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील हिंगोली गेट परिसरात गावठी पिस्टल बाळगणाऱ्या एका तरुणास स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी आज (मंगळवार) अटक केली आहे. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागातील पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या आदेशावरुन फौजदार साईनाथ पुयड व पोलीस कर्मचारी हे नांदेड शहरात गस्त घालीत असतांना हिंगोली गेट परिसरातील फटाका मार्केट मैदानात एक तरुण गावठी पिस्टल घेवून फिरत असल्याची माहिती त्यांना मिळाली. पोलीसाच्या पथकाने फटाका मार्केट मैदान भागात सापळा रचून नवज्योतसिंघ उर्फ



बिद्री प्रकाशसिंघ ग्रंथी (वय १९) रा.शहीदपूरा, गेट नं.६, नांदेड यास अटक केली. पोलीसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळ एक गावठी पिस्टल आढळून आली. पोलीसांनी सदरील गावठी पिस्टल जप्त केली आहे. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात नवज्योतसिंघ उर्फ बिद्री प्रकाशसिंघ ग्रंथी याच्या विरुध्द भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राज्यावर दुष्काळाचे सावट देशात १३ टक्के पर्जन्य तूट

मुंबई/प्रतिनिधी-अल निनोच्या प्रभावामुळे मराठवाडा-विदर्भातील अनेक ठिकाणी कमी पावसामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. आगामी काळात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता हवामान विभागाचे शास्त्रज्ञ सखाराम सानप यांनी व्यक्त केली आहे.

यावर्षी महाराष्ट्रातील मराठवाडा,विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने मोठी दडी मारली असून, देशात सरासरीच्या तुलनेत १३ टक्के पर्जन्य तूट नोंदली आहे.

जुलैमध्ये काही भागांत मुसळधार पाऊस झाल्याने अनेक धरणे भरली; मात्र राज्यातील बहुतांश भाग अद्याप पावसाच्या प्रतीक्षेत आहे. ऑगस्टचे दोन आठवडे उलटूनही मराठवाडा आणि विदर्भातील अनेक तालुक्यांत दमदार पाऊस झालेला नाही.पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली. सुरुवातीला उगवण चांगली झाली; मात्र सध्या पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यात पावसाने दडी मारल्याने सोयाबीन, कापूस, तूर यांसह खरीप पिके करपू लागली आहेत. त्यामुळे उत्पादन घटण्याची भीती निर्माण झाली आहे. पान ४ वर

### सुप्रिम कोर्टाचे याचिकाकर्त्यांना निर्देश

# गुरुद्वारा बोर्ड निवडणुकीसाठी उच्च न्यायालयात जा

नांदेड/प्रतिनिधी-तख्त सचखंड श्री हजूर साहिब अबचलनगर साहिबच्या व्यवस्थापनातील निवडणूक आणि स्वायत्ततेच्या प्रश्नावर सुरू असलेल्या कायदेशीर लढ्याला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशामुळे पुढील दिशा मिळाली आहे. १७ ऑगस्ट रोजी न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने रिट याचिका निकाली काढताना याचिकाकर्त्यास उच्च न्यायालयात नव्याने अवमान याचिका किंवा रिट याचिका दाखल करून योग्य ते निर्देश मागण्याची मुभा दिली.

माहिती अधिकार कार्यकर्ते जगदीपसिंघ मोहनसिंघ नंबरदार यांनी महाराष्ट्र राज्य व अन्य यांच्याविरुद्ध अनुच्छेद ३२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ८ मार्च २०२२ रोजी निवडून आलेल्या संचालक मंडळाचा कार्यकाळ संपल्यानंतर निवडणूक न झाल्याने प्रशासकांच्या माध्यमातून व्यवस्थापन सुरू असल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा आहे.यापूर्वी याचिकाकर्त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात रिट याचिका क्र.१००५/२०२२ दाखल केली होती. त्यानंतर अवमान पान ४ वर

# विधानसभा अध्यक्षांनी मर्यादा ओलांडली

## शिवसेना प्रकरणी सिब्बलांचा जोरदार युक्तीवाद


नवी दिल्ली : शिवसेना आमदार अपात्रतेचा निर्णय घेतांना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी घटनात्मक मर्यादा ओलांडली असा युक्तीवाद आज शिवसेना ठाकरे गटाचे वकील ॲड.कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात जोरकसपणे मांडला.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण निवडणूक चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी आज पुढे सुरू झाली. ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी अपात्रतेच्या प्रश्नावर भूमिका मांडताना म्हटले की, दहाव्या अनुसूचीनुसार विधिमंडळातील फुटीला स्वतंत्र बचाव म्हणून मान्यता राहिलेली नाही. एखाद्या आमदाराने स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडल्याचा आरोप करून अपात्रतेची याचिका दाखल झाली, तर त्यासमोर पक्षाशी आपला संबंध कायम असल्याचा दावा केला जाऊ शकतो. पक्षाचा अधिकृत व्हीप कोण जारी करणार आणि त्याचे पालन करणे कोणाला बंधनकारक आहे, हा त्यातून निर्माण होणारा महत्त्वाचा प्रश्न आहे. सिब्बल यांच्या मते, एकीकडे एखादा गट निवडणूक आयोगाकडे आपणच मूळ राजकीय पक्ष असल्याचा दावा करीत असेल आणि दुसरीकडे त्याच गटातील आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न अध्यक्षांसमोर प्रलंबित असेल, तर या दोन्ही प्रक्रिया स्वतंत्रपणे पाहता येणार नाहीत. आमदार अपात्र ठरल्यास त्यांचे विधिमंडळातील संख्याबळ पक्षाच्या दाव्यासाठी मोजता येणार नाही. त्यामुळे खरा राजकीय पक्ष कोणता हे निश्चित करण्याची प्रक्रिया आधी झालेल्या अपात्रतेच्या निर्णयाशी जोडलेली असणे आवश्यक आहे, असा त्यांचा युक्तिवाद होता. याच संदर्भात सिब्बल यांनी सुभाष देसाई प्रकरणाचा आधार घेतला. विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष या दोन स्वतंत्र संकल्पना आहेत. त्यामुळे विधिमंडळातील एखाद्या गटाकडे बहुमत आहे म्हणून तोच संपूर्ण राजकीय पक्ष आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही, असे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

# दाभोळकर हत्या प्रकरणातील सचिन अंदुरेला जामीन;जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती

## मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी सचिन अंदुरे याला मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी जामीन मंजूर केला. तसेच पुण्यातील विशेष न्यायालयाने सुनावलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेलाही उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.



पुण्यात २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या डॉ. दाभोलकर यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. ओंकारेश्वर परिसरातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर ही घटना घडली होती. या हल्ल्यात डॉ. दाभोळकर यांचा मृत्यू झाला. सुरुवातीला पुणे पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास करण्यात आला. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २०१४ मध्ये केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) तपास हाती घेतला. दीर्घकाळ चाललेल्या तपासानंतर पुण्यातील विशेष न्यायालयाने १० मे २०२४ रोजी सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना डॉ. दाभोळकर यांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. दोघांनाही प्रत्येकी पाच लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. त्याचवेळी डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. विशेष न्यायालयाच्या या निर्णयाला आव्हान देत सचिन अंदुरेने मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. अपील प्रलंबित असताना जामीन देण्यात यावा तसेच जन्मठेपेच्या शिक्षेला स्थगिती द्यावी, अशी मागणी त्याने केली होती. या मागणीवर सुनावणी झाल्यानंतर उच्च न्यायालयाने मंगळवारी अंदुरेला दिलासा दिला. या प्रकरणातील सहआरोपी शरद कळसकर यालाही मुंबई उच्च न्यायालयाने एप्रिल २०२६ मध्ये जामीन मंजूर केला होता. कळसकरच्या ओळखी बाबत आणि उपलब्ध पुराव्यांबाबत न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर आता अंदुरेलाही जामीन मिळाल्याने दाभोळकर हत्या प्रकरणातील दोषी ठरविण्यात आलेले दोन्ही आरोपी सध्या उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे कारागृहाबाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अंदुरेच्या जामीन अर्जावर सुनावणीदरम्यान त्याच्या वकिलांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या जबाबांमधील कथित विसंगती तसेच ओळख परेड न झाल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. सीबीआयने मात्र साक्षीदारांनी अंदुरेची ओळख पटविल्याचा दावा करत जामिनाला विरोध केला होता.

# कर्तव्यनिष्ठतेला सलाम!

**नांदेडच्या माता साहेब गुरुद्वारा परिसरात पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीरसिंघ बादल यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला आणि या घटनेने शहराच्या कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सुरक्षा व्यवस्था असतानाही एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीपर्यंत हल्लेखोर पोहोचतो, ही बाब निश्चितच गंभीर आहे. मात्र या प्रसंगी तेथे तैनात असलेल्या पोलीस निरीक्षकाने प्रसंगावधान दाखवत हल्लेखोराचा वार स्वतःच्या हातावर घेतला आणि मोठा अनर्थ टाळला. त्यांच्या धाडसाचे मनापासून कौतुक केले पाहिजे. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावणाऱ्या त्या पोलीस अधिकाऱ्याच्या कर्तव्यनिष्ठेला मनापासून सलाम! मात्र या घटनेपुरतेच या प्रश्नाकडे पाहून चालणार नाही. गेल्या काही दिवसांपासून नांदेडमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रे सापडत आहेत. दिवसाढवळ्या खून होत आहेत, चोरी आणि लुटमारीच्या घटना घडत आहेत. शहरातील गजबजलेल्या भागात, भर रस्त्यावर आणि नागरिकांची वर्दळ असतानाही गुन्हे घडत असतील तर ही बाब नांदेडच्या शांतताप्रिय नागरिकांसाठी निश्चितच चिंताजनक आहे. नांदेड पोलिसांकडून गुन्हेगारांविरुद्ध सातत्याने कारवाई केली जात आहे. शस्त्रे जप्त केली जात आहेत, आरोपींना अटक केली जात आहे आणि गुन्हे उघडकीस आणले जात आहेत. पोलिसांची ही कारवाई कौतुकास्पद आहे. परंतु त्याचवेळी एक प्रश्न उपस्थित होतो; एका गुन्हेगाराला पकडले जाते आणि दुसऱ्या बाजूला अनेक गुन्हेगार रस्त्यावर उतरतात, असे चित्र का निर्माण होत आहे? गुन्हेगारांना पोलिसांचा धाक राहिला पाहिजे. कायद्याची भीती संपली की गुन्हेगारीला बळ मिळते. विशेषतः शहरात बेकायदेशीर शस्त्रांची उपलब्धता वाढत असेल तर ही बाब अधिक गंभीर आहे. शस्त्रे कुठून येतात, कोण आणते, कोणाला पुरवली जातात आणि त्यामागे कोणते नेटवर्क आहे, याचा तपास केवळ वरवर न करता मुळापर्यंत जाऊन झाला पाहिजे. शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तीला अटक करणे महत्त्वाचे आहेच; पण त्यामागील सूत्रधार आणि पुरवठा साखळीपर्यंत पोहोचणे त्याहून महत्त्वाचे आहे. गुन्हा घडल्यानंतर पोलिसांची धावपळ होण्यापेक्षा गुन्हा घडण्यापूर्वीच तो रोखला जाणे आवश्यक आहे. शहरातील संवेदनशील भागांमध्ये नियमित गस्त वाढवणे, सीसीटीव्ही यंत्रणा अधिक सक्षम करणे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे गरजेचे आहे. पोलिसांची उपस्थिती ही केवळ घटना घडल्यानंतर दिसणारी नसून नागरिकांना सतत जाणवणारी असली पाहिजे. मात्र कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी केवळ पोलिस यंत्रणेची नाही. समाजाचीही त्यात महत्त्वाची भूमिका आहे. आपल्या परिसरात संशयास्पद हालचाली दिसत असतील तर त्याची माहिती पोलिसांना देणे, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना सामाजिक पाठबळ न देणे आणि तरुणांना गुन्हेगारीच्या मार्गापासून दूर ठेवणे, ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. माता साहेब गुरुद्वारा परिसरातील घटना ही केवळ एका व्यक्तीवरील हल्ल्याची घटना म्हणून पाहता कामा नये. सुरक्षा व्यवस्था असतानाही हल्लेखोर इतका जवळ पोहोचू शकतो, हा सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीनेही महत्त्वाचा धडा आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी शोधून त्या दूर करणे आवश्यक आहे. नांदेड ही संतांची आणि शांतताप्रिय नागरिकांची भूमी आहे. या शहराची ओळख गुन्हेगारी, दहशत किंवा बेकायदेशीर शस्त्रांच्या बाजारपेठेने व्हावी, हे कोणालाही मान्य होणार नाही. पोलिस यंत्रणा सतर्क आहे, हे निश्चित; पण घटना घडल्यानंतरची सतर्कता पुरेशी नाही, घटना घडू नयेत यासाठीची पूर्वसतर्कता अधिक महत्त्वाची आहे. गुरुद्वारा परिसरातील प्रसंगात एका पोलिस अधिकाऱ्याने दाखवलेले धैर्य नांदेडच्या पोलिस दलाचा अभिमान वाढवणारे आहे. आता त्याच धैर्याला गुन्हेगारी विरोधातील व्यापक आणि प्रतिबंधात्मक कारवाईची जोड मिळणे आवश्यक आहे. कारण नांदेडच्या नागरिकांना भीतीत नव्हे, तर निर्भय वातावरणात जगायचे आहे. शहराची शांतता अबाधित ठेवणे ही पोलिसांची जबाबदारी आहेच; पण ती जपण्यासाठी नागरिकांनीही पोलिसांच्या सोबत उभे राहणे ही काळाची गरज आहे.**

# परीक्षांचा बट्ट्याबोळ; आता न्यायपालिकेतील 'टायपिंग टेस्ट'वरही प्रश्नचिन्ह!

सध्या देशासह राज्यात विद्यार्थ्यांच्या भविष्याशी सरकार काय-काय खेळ खेळत आहे हे सर्वांच्या समजन्याच्या पलीकडचे असल्याचे दिसून येते. स्पर्धा परीक्षांतील सावळा गोंधळ थांबता-थांबेनां, या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर जंतरमंतर, बिहार, झारखंडसह अनेक राज्यात जेन-झीचे आंदोलन झाले आणि सुरू आहे. हे सर्व सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे तरी पुन्हा-पुन्हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होत आहे ही अत्यंत दुःखद व दुर्दैवी बाब आहे आणि याची पुनरावृत्ती हायकोर्टाच्या टायपिंग स्किल परीक्षेदरम्यान दिसून आली.

आज विद्यार्थ्यांच्या भविष्याचे नुकसान होत आहे त्याचे काय? याचे उत्तर कोण देणार! सरकार असो अथवा हायकोर्ट विद्यार्थ्यांचे भविष्य खराब करू नका. हायकोर्टाच्या टायपिंग परीक्षेसाठी राज्यात १९ सेंटर होते.मुख्य म्हणजे टायपिंग परीक्षा कशा पध्दतीने होणार आहे याचीही कोणत्याही प्रकारची नोटीफीकेशन जाहिरीमध्ये किंवा एडमिशन कार्डमध्ये नव्हती. ऐनवेळेवर नोटीफीकेशन जाहीर केली व विद्यार्थ्यांची तारांबळ उडाली. ही सर्वात मोठी चूक हायकोर्टाने परीक्षेच्या दरम्यान केल्याचे दिसून येते. म्हणजे ज्या गोष्टी विद्यार्थ्यांना किंवा उमेदवारांना परीक्षेच्या दरम्यान १० ते १५ दिवस अगोदर माहित असने आवश्यक असते त्यापासून हायकोर्टाने उमेदवारांना कोसो दुर ठेवल्याचे दिसून आले. त्यामुळे सर्वच ठिकाणी सुरळीत परीक्षा झालीच नाही ही बाब विद्यार्थ्यांच्या आक्रोशावरून स्पष्ट दिसून येते. या गोंधळलेल्या परीस्थितीमुळे आज ९९ टक्के विद्यार्थी नापास झाल्याचे दिसून येते. जो विद्यार्थी कँटीन्यु टायपिंग करतो आणि परीक्षेकरीता पुर्ण तयारी करतो त्याला जर २० पैकी १ ते ५ मार्क मिळत असेल तर ही कसली परीक्षा म्हणावी! यामुळे हायकोर्टाच्या टायपिंग टेस्ट परीक्षेत मोठ्या प्रमाणात तृटी असल्याचे सिद्ध होते व प्रश्न चिन्ह उपस्थित होतो. यावरून आपण समजू शकतो की, महाराष्ट्रातील संपूर्ण सेंटरवर गोंधळाचे वातावरण होते. त्यामुळे आता यावर एकच उपाय आहे तो म्हणजे ताबडतोब फेरपरीक्षा घेणे. कारण जेव्हा ११५९२२ उमेदवार परीक्षा देतात त्यातून टायपिंग परीक्षेसाठी मेहनतीच्या बळावर राज्यात ११६१७



उमेदवार पात्र ठरतात आणि याही ठिकाणी सर्वच सेंटरवर मोठ्या प्रमाणात उमेदवार गोंधळतात यावरून स्पष्ट होते की, परीक्षा व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिक तृटी अवश्य असावी. त्यामुळे हा गोंधळ फक्त संभाजीनगर, मुंबई, भंडारा, कल्याण, अमरावती, वर्धा यांच्या पुरता सिमित नसून संपूर्ण १९ सेंटरवर हा गोंधळ झालेला आहे ही बाब सिद्ध होते. याला तर विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खुला खेळच म्हणावा लागेल.

**रमेश लांजेवार**
नागपूर

विद्यार्थ्यांच्या बाबतीत सर्वत्र सावळा गोंधळ होतांना आपण पहाले; आता हायकोर्टाच्याही परीक्षेतही गोंधळात- गोधळात गोंधळ मग आता विद्यार्थ्यांनी करायचे तरी काय असे अनेक प्रश्न आज युवा पिढीपुढे उपस्थित होत आहे.हायकोर्टाने २०२६ करीता लिपिक भरती पदासाठी जाहिरात प्रसिद्ध केली यात एकुण ११५९२२ अर्ज आलेत याची परीक्षा सुरळीत पार पडली व टायपिंग टेस्टसाठी ११६१७ उमेदवार पात्र ठरले. अशा परिस्थितीत ११६१७ विद्यार्थ्यांच्या आशा उंचावल्या आणि त्यांच्यात आनंदाचे वातावरण दिसून आले कारण ज्या क्षेत्रातील ही परीक्षा होती ते क्षेत्र कायद्याचे क्षेत्र असल्याने जे काही होईल ते योग्यच होईल असे विद्यार्थ्यांना ठाम वाटत होते. परंतु हायकोर्टाच्या टायपिंग टेस्ट परीक्षेत सर्वत्र महाघोळ आढळून आला व संपूर्ण परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्या व सर्वत्र गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. हायकोर्टाची लिपिक पदाची भरती मुंबई,औरंगाबाद व नागपूर खंडपीठासाठी होती आणि या संपूर्ण सेंटरवर गोंधळाचे वातावरण असल्याचे दिसून आले. उमेदवारांना प्रत्येक सेंटरवर वेगवेगळ्या अडचणी दिसून आल्या त्यामुळे संपूर्ण विद्यार्थी गोंधळले यामध्ये कीबोर्ड लहान मोठे होते,कीपॅड वरील की दबत नव्हत्या, सॉफ्टवेअरमध्ये ग्लीचेस दिसून आले, स्क्रीन दिसत नव्हती, सगळ्याचा लॉगीन सेम टाईमला झाले नाही त्यामुळे आपापसात गोंधळ निर्माण झाला, एकूण शब्द आणि गाळलेले शब्द याची तुलना झाली नाही, उमेदवारांना १० मिनिटांत ४०० शब्द करायचे होते परंतु उमेदवारांचे म्हणने आहे की, ४०० पेक्षा अधिक शब्द असल्याने सर्वच सेंटरवरील विद्यार्थी गोंधळले अशा प्रकारच्या अनेक त्रुटी व तांत्रिक अडचणींना उमेदवारांना परीक्षेच्या वेळी सामोरे जावे लागले व सर्वत्र सावळा गोंधळ उडाला व पुन्हा एका परीक्षेचा बट्ट्याबोळ झाला. यामुळे संपूर्ण विद्यार्थी हताश झाल्याचे दिसून आले. सरकारला व हायकोर्टाला विनंती करतो की, टायपिंग स्किल परीक्षेदरम्यान हायकोर्टाकडून झालेल्या संपूर्ण तांत्रिक चुका लक्षात घेता. संपूर्ण परीक्षा रद्द करून व विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा व भविष्याचा विचार करून ताबडतोब योग्य रीतीने टायपिंग स्किल फेरपरीक्षा घेण्यात यावी.

# स्वातंत्र्याचे ८० वे वर्ष आणि डावी चळवळ



१५ ऑगस्ट २०२६ ला भारताला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण होत आहेत. अमृत महोत्सव नंतर आता अमृत काल मध्ये आपण प्रवेश करत आहोत. ८० वर्षांच्या या प्रवासात देशाने खूप मोठी झेप घेतली. पण स्वातंत्र्याचा खरा अर्थ काय? स्वराज्य सोबत सुराज्य आले का? याच प्रश्नाचे उत्तर शोधताना डाव्या चळवळीची भूमिका आणि आपल्या मातीतील महापुरुषांचे विचार समजून घ्यावे लागतात.

**१. स्वातंत्र्याची दोन स्वप्ने आणि मातीचा वारसा-** १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळताना आपल्यासमोर दोन स्वप्ने होती.पहिलं-राजकीय स्वातंत्र्य.गोऱ्या इंग्रजांपासून मुक्ती. दुसरं-सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य. बंधन तोडीत भूक, दारिद्र्य, जात, शोषण यातून मुक्ती.पण हे दुसरे स्वप्न नवीन नव्हते. ते आपल्या मातीत शेकडो वर्षांपासून रुजले होते.राजे शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य, १८ पगड जातींना न्याय, आणि प्रजेचे हित हेच राजाचे हित हा मंत्र दिला.महात्मा फुले यांनी शेतकऱ्याचा आसूड ने शेतकरी आणि बहुजनांच्या शिक्षणाचा पाया घातला.राजर्षी शाहू महाराजांनी आरक्षणाची सुरुवात करून मागासवर्गीयांना संधी दिली.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची गॅरंटी दिली.डावी चळवळ हेच या महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारांचे आजचे राजकीय रूप आहे.

**२. ८० वर्षात डाव्या चळवळीचे योगदान-** अ) कष्टकऱ्यांचे हक्क-फुले-शाहूंचा वारसा: शेतात रानात, जिथं घामानं भिजली धरती. शेतकरी, कामगार, मजूर यांना किमान वेतन, ८ तासांचा दिवस हे सगळे डाव्या चळवळीच्या आंदोलनातूनच मिळाले. फुले जे शेतकरी आणि कामकरी म्हणायचे, त्याच वर्गासाठी डावी चळवळ आजही लढते. ब) समतेची लढाई-शाहू-आंबेडकरांचा मार्ग: वाडे जातीपातीचे, ज्यात माणसं कोंडली. शाहू महाराजांनी आरक्षण दिले, बाबासाहेबांनी ते संविधानात बंदिस्त केले. त्याच विचारावर डावी चळवळ जातीभेद, अस्पृश्यता, शोषणाविरुद्ध रस्त्यावर उतरते. भूदान, आदिवासींचे प्रश्न हे मुद्दे डाव्यांनीच पहिल्यांदा मांडले. क) सार्वजनिक व्यवस्था-शिवरायांचे रयतेचे राज्य: शिवाजी महाराजांनी सांगितले राज्य हे प्रजेसाठी आहे. त्याच तत्वावर मोफत शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, रेशनिंग या संकल्पना डाव्या विचारातून आल्या. नफ्यासाठी नसून हक्क म्हणून माणसाला जगता यावे यासाठी डावी चळवळ आग्रही राहिली. ड) अन्यायाविरुद्ध आवाज-बंडाचा वारसा: अन्यायाविरुद्ध, जिथं मुठी हो वळल्या. शिवरायांनी जुलमाविरुद्ध तलवार उचलली, फुलेंनी ब्राह्मणी वर्चस्वाला प्रश्न केला, बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळली. त्याच बंडाचा वारसा डावी चळवळ आज लोकशाही वाचवण्यासाठी पुढे चालवते.

**कॉ.प्रफुल्ल कउडकर**
मो.क्र.८४११९२५७५८

**३. ८० व्या वर्षी समोरची आव्हाने-** स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्षी देखील चित्र बदलले नाही. १.आर्थिक विषमता: १% लोकांकडे देशाच्या ४०% संपत्ती आहे. फुलेंचा बलुतेदार आजही गरीब आहे., २.बेरोजगारी: शिकलेला तरुण नोकरीसाठी भटकतोय. शाहूंच्या आरक्षणालाही आज आव्हान आहे.,३. शेतकऱ्यांचे प्रश्न: कर्जमाफी आणि एमएसपी अजूनही आंदोलनाचा विषय आहे., ४.सामाजिक ध्रुवीकरण: वाडे जातीपातीचे अजूनही भक्कम आहेत. बाबासाहेबांचे स्वप्न अपूर्ण आहे.या पार्श्वभूमीवर डाव्या चळवळीची गरज संपली नाही, उलट वाढली आहे. ४. पुढची वाट: ८० ते १०-शिव-फुले-शाहू-आंबेडकरी वाट पुढची २० वर्षे ही सामाजिक न्यायाचे दशक असली पाहिजेत. त्यासाठी डाव्या चळवळीसमोर ३ कामे आहेत.


१.नव्या प्रश्नांना सामोरे जाणे: गिग वर्कर, प्लॅटफॉर्म कामगार, हवामान बदल या नव्या मुद्द्यांवर लढा उभा करणे., २.सांस्कृतिक लढाई: द्वेषाच्या विरोधात बंधुत्वाची भाषा बोलणे. समतेच्या वाटेनं, तू खणकावत पैंजण यावं. शिवरायांची सर्वधर्म समभाव ची शिकवण पुढे नेणे., ३.पर्याय देणे: फक्त विरोध नाही, तर शिक्षण, आरोग्य, रोजगाराचा ठोस पर्यायी मॉडेल मांडणे. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा बाबासाहेबांचा मंत्र राबवणे.स्वातंत्र्याचे ८० वर्ष म्हणजे फक्त जल्लोषाचा विषय नाही. ती आत्मपरीक्षणाची वेळ आहे.डावी चळवळ म्हणजे देशद्रोह नाही. ती शिव-फुले-शाहू-आंबेडकरी देशप्रेम आहे. कारण देश म्हणजे फक्त सीमा नाही, देश म्हणजे त्यात राहणारा शेवटचा माणूस आहे. जोपर्यंत एकाही मुलाला भुकेपोटी शाळा सोडावी लागते, जोपर्यंत एकाही महिलेला सुरक्षितता नाही, तोपर्यंत बंधन तोडीत चालणारी डावी चळवळ थांबणार नाही.स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्षी आपण ठरवूया स्वातंत्र्य फक्त झेंड्यात नाही, ते प्रत्येकाच्या पोटात, शिक्षणात आणि सन्मानात असले पाहिजे. आणि त्यासाठी समतेच्या वाटेनं चालणं हाच खरा स्वातंत्र्याचा अर्थ आहे.

# कंधारच्या नागशिल्पांतून उलगडणारी प्राचीन नागपूजेची परंपरा

कंधार/प्रतिनिधी- नांदेड जिल्ह्यातील कंधार हे केवळ एक ऐतिहासिक शहर नसून विविध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचा वारसा जपणारे महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखले जाते. कंधारच्या परिसरात हिंदू, बौद्ध आणि जैन धार्मिक परंपरांशी संबंधित अनेक पुरातत्त्वीय अवशेष आढळतात. भुईकोट किल्ला परिसर, मानसपुरी, नवरंगपुरा, बहादरपुरा आदी भागांत विखुरलेली शिल्पे आणि स्थापत्य अवशेष कंधारच्या प्राचीन वैभवाची साक्ष देतात. याच अवशेषांमध्ये आढळणारी नागशिल्पे कंधारच्या धार्मिक इतिहासातील एक वेगळा आणि अभ्यासनीय पैलू समोर आणतात.

कंधार परिसरात विविध ठिकाणी नागांची कोरीव शिल्पे आढळतात. नागप्रतिमांना भारतीय धार्मिक आणि लोकपरंपरेत विशेष स्थान आहे. नाग हा केवळ सर्प म्हणून नव्हे, तर भूमी, जल, सुपीकता आणि संरक्षणाशी संबंधित दैवत म्हणूनही अनेक प्राचीन परंपरांमध्ये पूजला गेला आहे. त्यामुळे कंधारमधील नागशिल्पांचा अभ्यास केवळ कलात्मक दृष्टीने नव्हे, तर धार्मिक आणि सामाजिक इतिहासाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा ठरतो.

**कंधार बहादरपुरातील नागशिल्प-**बहादरपुरा येथील श्री मारुती मंदिराच्या प्रांगणात नागशिल्प असल्याचे स्थानिक परंपरेत सांगितले जाते. अशा शिल्पांवरून त्या काळातील धार्मिक श्रद्धा, लोकविश्वास आणि सर्पपूजेच्या परंपरेचा अंदाज घेता येतो. मंदिर परिसरात नागप्रतिमेचे अस्तित्व हे पुढील काळातही या श्रद्धेचे लोकजीवनाशी असलेले नाते दर्शवते. कंधार शहरातील मध्यवस्तीमध्ये असलेल्या एका प्राचीन वाड्यालाही या संदर्भात विशेष महत्त्व आहे. स्थानिक माहितीनुसार हा वाडा टेळकीकरांचा वाडा किंवा प्रधानांचा वाडा या नावाने परिचित आहे. या वाड्याच्या उजव्या कोपऱ्यावर नागदेवतेचे एक मंदिर आहे. तेथील दगडी शिळेवर दोन नाग कोरलेले असून त्यांपैकी एक नाग मोठ्या आकाराचा, तर दुसरा तुलनेने लहान आहे. या शिळेची उंची सुमारे चार फूट आणि रुंदी सुमारे चार फूट असल्याचे सांगितले जाते. नागांच्या फण्यांची रचना, शरीरावरील कोरीव तपशील आणि



शिल्पाची मांडणी यामुळे हे शिल्प लक्षवेधी ठरते.

**नागपंचमीला आजही जागी होते परंपरा-** या प्राचीन शिल्पांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्याशी जोडलेली आजची लोकश्रद्धा. नागपंचमीच्या दिवशी या ठिकाणी मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. पूजा-अर्चा आणि धार्मिक विधींच्या माध्यमातून नागदेवतेप्रती श्रद्धा व्यक्त केली जाते. नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी येथे भंडाऱ्याचे आयोजन करण्याची परंपराही असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जाते. आजच्या काळात या शिल्पांकडे केवळ धार्मिक श्रद्धेच्या दृष्टीने पाहण्यापेक्षा त्यामागील ऐतिहासिक संदर्भ समजून घेणे आवश्यक आहे. एखाद्या ठिकाणी नागशिल्प आढळणे म्हणजे त्या परिसरातील सर्व लोक निश्चितच नागपूजक होते, असा थेट निष्कर्ष काढता येत नाही. मात्र, अशा शिल्पांची संख्या, त्यांची धार्मिक स्थळांशी असलेली सांगड आणि आजपर्यंत टिकून राहिलेली नागपंचमीची परंपरा यांचा एकत्रित अभ्यास केल्यास कंधारच्या सांस्कृतिक इतिहासात नागपूजेला काही प्रमाणात महत्त्वाचे स्थान असावे, असे दिसून येते.

**पुरातत्त्व आणि लोकपरंपरेचा दुवा-**कंधारचा इतिहास हा केवळ किल्ले, मंदिरे आणि राजकीय सत्तांच्या अवशेषांपुरता मर्यादित नाही. येथील दगडी शिल्पे, धार्मिक प्रतीके, लोकदेवता आणि सण-उत्सवांच्या परंपरा यांमधून सामान्य लोकांच्या श्रद्धाविश्वाचीही ओळख होते. नागशिल्पे हा त्यातील महत्त्वाचा दुवा आहे. काळाच्या ओघात अनेक वास्तू बदलल्या, काही अवशेष दुर्लक्षित झाले; मात्र लोकपरंपरेतून काही श्रद्धा आजही जिवंत राहिल्या आहेत. कंधारमधील नागदेवतेचे स्थान आणि नागपंचमीच्या निमित्ताने होणारी पूजा ही त्याचेच उदाहरण म्हणता येईल. त्यामुळे या शिल्पांचे शास्त्रीय दस्तऐवजीकरण, छायाचित्रण, कालविनिश्चिती आणि पुरातत्त्वीय अभ्यास होणे गरजेचे आहे.

**इतिहासाचा जिवंत वारसा-**कंधारच्या भूमीत सापडणारी नागशिल्पे ही भूतकाळातील धार्मिक श्रद्धांची दगडी साक्ष आहेत, तर नागपंचमीच्या दिवशी होणारी पूजा हा त्या वारशाचा आजच्या लोकजीवनाशी जोडलेला जिवंत धागा आहे. मानसपुरी, नवरंगपुरा, बहादरपुरा आणि किल्ला परिसरातील विविध अवशेषांसोबत या नागशिल्पांचाही अभ्यास केला, तर कंधारच्या धार्मिक-सांस्कृतिक इतिहासाचे अधिक व्यापक चित्र समोर येऊ शकते. म्हणूनच कंधारमधील नागशिल्पांकडे केवळ श्रद्धेचे प्रतीक म्हणून नव्हे, तर इतिहास, पुरातत्त्व, लोकसंस्कृती आणि धार्मिक परंपरा यांना जोडणारा मौल्यवान वारसा म्हणून पाहण्याची गरज आहे. शेकडो वर्षांच्या बदलत्या काळातही जपली गेलेली नागदेवतेची ही परंपरा कंधारच्या सांस्कृतिक स्मृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# सराफा व्यापाऱ्यांच्या समस्यांवर आ.बोंढारकर यांनी मांडले प्रश्न

## पोलिस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्यासोबत बैठक



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील सराफा व्यापाऱ्यांच्या विविध समस्या आणि सुरक्षेच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी नांदेड दक्षिणचे आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या पुढाकाराने सराफा व्यापाऱ्यांची बैठक घेण्यात आली. सराफा बाजारातील मुरली मंदिर येथे पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. बैठकीला सराफा व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सराफा व्यापाऱ्यांनी पोलिसांकडून होणारा त्रास, चोरीच्या घटनांमध्ये चुकीच्या पद्धतीने व्यापाऱ्यांच्या दुकानांची माहिती दिली जाणे, तसेच परराज्यातील पोलिसांकडून स्थानिक पोलिसांना माहिती न देता थेट दुकानात येऊन व्यापाऱ्यांना चौकशीसाठी घेऊन जाणे आदी विविध समस्या मांडल्या.काही प्रकरणांमध्ये व्यापाऱ्यांकडून चुकीच्या पद्धतीने वसुलीची मागणी केली जात असल्याच्या तक्रारीही बैठकीत करण्यात आल्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी व्यापाऱ्यांनी केली. आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांनी सराफा व्यापाऱ्यांना होणाऱ्या त्रासाबाबत नाराजी व्यक्त केली. व्यापाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत आवश्यक संरक्षण मिळाले पाहिजे. चोरी किंवा अन्य कोणत्याही गुन्ह्याच्या प्रकरणात केवळ संशयाच्या आधारे व्यापाऱ्यांवर कारवाई न करता सखोल चौकशी करूनच पुढील कार्यवाही करण्यात यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. सराफा व्यापाऱ्यांकडून पोलिस विभागातील काही व्यक्तींविरुद्ध करण्यात आलेल्या वसुलीच्या तक्रारींचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आ.बोंढारकर यांनी केली. व्यापारी आणि पोलिस प्रशासन यांच्यात समन्वय राहून सराफा व्यापाऱ्यांच्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.

पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी व्यापाऱ्यांच्या समस्या ऐकून घेत संबंधित बाबींवर आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. बैठकीमुळे सराफा व्यापारी आणि पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ होण्यास मदत होणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले.या बैठकीस नांदेड दक्षिणचे आ.आनंदराव पाटील बोंढारकर, आ.बालाजीराव कल्याणकर, जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, शहरप्रमुख तुलजेश यादव, युवासेना जिल्हाप्रमुख बाळु पाटील मोरे, जिल्हासंघटक शंकर पिनोजी, सराफा असोसिएशन दक्षिणचे अध्यक्ष सुधाकर टाक,उत्तरचे अध्यक्ष शिवा टाक, अच्युत जगताप, शिरूसिंह चव्हाण, पांडुरंग येरावार, पांडुरंग लोलगे, भागवत गंगमवार, नवल बाकलीवाल, अनिल धानोरकर, श्याम उदावंत, आनंद वर्मा, बंडु धानोरकर यांच्यासह शहरातील सराफा व्यापारी उपस्थित होते.

# माहूर तालुक्यातील ग्रामसभा ठरल्या वादळी

## जेन झी मैदानात,प्रश्नांच्या सरबत्तीने ग्रामसभा तापली

माहूर/प्रतिनिधी-स्वातंत्र्य दिनानिमित्त माहूर तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभा यंदा चांगल्याच वादळी ठरल्या. गावच्या विकासकामां पासून ग्राम पंचायतीच्या कारभारापर्यंत अनेक मुद्द्यांवर ग्रामस्थांनी थेट प्रश्न उपस्थित केले, तर नव्या पिढीतील युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग ग्रामसभांचे विशेष आकर्षण ठरले.

गावातील समस्या, शासनाच्या विविध योजना, विकासकामांसाठी आलेला निधी, त्याचा खर्च, कामांची गुणवत्ता, लाभार्थ्यांची निवड आणि ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कारभाराबाबत युवकांनी प्रश्नांची सरबत्ती करीत संबंधितांना जाब विचारला. त्यामुळे अनेक ठिकाणी ग्रामसभेचे वातावरण चांगलेच तापले. विशेष म्हणजे काही गावांतील ग्रामस्थ व युवकांनी ग्रामसभांचे समाजमाध्यमांवर थेट प्रक्षेपण केले. त्यामुळे ग्रामसभेतील चर्चा केवळ ग्रामस्थांपुरती मर्यादित न राहता ती सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या संख्येने नागरिकांपर्यंत पोहोचली. काही ग्रामपंचायतींच्या कारभारात कथित अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारीही ग्रामसभेत मांडण्यात आल्या असून, संबंधित प्रकरणांबाबत दि.१७ ऑगस्ट रोजी माहूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल झाल्याची माहिती आहे. त्यामुळे आता या तक्रारींची प्रशासनाकडून चौकशी होणार का, संबंधित कागदपत्रांची तपासणी केली जाणार का आणि दोषी आढळल्यास जबाबदारांवर कारवाई होणार का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. स्वातंत्र्यदिनाच्या ग्रामसभेची अनेक ग्रामस्थ वर्षभर प्रतीक्षा करतात, कारण गावाच्या विकासाचा आराखडा, विविध शासकीय योजनांची माहिती, स्थानिक समस्या आणि ग्रामपंचायतीच्या निर्णयांवर चर्चा करण्याचे हे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. यंदाच्या ग्रामसभांना मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि विशेषतः युवकांची वाढलेली उपस्थिती पाहता गावाच्या कारभारात नव्या पिढीचा हस्तक्षेप वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. गावाचा पैसा कुठे खर्च झाला?, कामे कोणती झाली?, योजनांचा लाभ कोणाला मिळाला? आणि ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता आहे का? या प्रश्नांनी अनेक ग्रामसभांमध्ये प्रशासन व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची चांगलीच कोंडी केली. त्यामुळे यंदाच्या ग्रामसभा केवळ ठराव मंजूर करणाऱ्या औपचारिक बैठका न राहता जाब विचारणाऱ्या आणि हिशेब मागणाऱ्या ग्रामसभा ठरल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. आता ग्रामसभांमध्ये उपस्थित झालेल्या प्रश्नांवर आणि दाखल झालेल्या तक्रारींवर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण माहूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.




जिल्हा माहिती कार्यालयातील उपसंपादक सौ.अलका पाटील यांची जिल्हा माहिती अधिकारी हिंगोली या पदावर बदली झाली. यावेळी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे माजी कोषाध्यक्ष व राज्य शासनाच्या लातूर विभाग अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष विजय जोशी, जिल्हा पत्रकार संघाचे सरचिटणीस अनुराग पवळे, अधिस्वीकृती समितीचे सदस्य अमोल आंबेकर, उर्दू मीडियाचे अब्दुल सत्तार आदी दिसत आहेत.

# प्रदूषणमुक्तीचा संदेश देत नांदेड-माहूर-नांदेड २४६ किमी सायकल वारी यशस्वी

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय स्वातंत्र्यदिनाचा ८० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करत असताना येथील एस.जी.जी.एस. फिटनेस क्लबच्या १३ सदस्यांनी प्रदूषणमुक्त भारत, पेट्रोलची बचत आणि निसर्गाचे संवर्धन असा सामाजिक व पर्यावरणपूरक संदेश देत नांदेड-माहूर-नांदेड असा तब्बल २४६ किलोमीटरचा आव्हानात्मक सायकल प्रवास यशस्वीपणे पूर्ण केला. व फिटनेससोबतच सामाजिक आणि पर्यावरणीय बांधिलकी जपण्याचा आदर्श निर्माण केला.

सामान्य नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करणे, वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी सायकलचा वापर वाढविणे, इंधनाची बचत करणे तसेच निसर्गाचे संरक्षण करण्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे हा या सायकल वारीचा प्रमुख उद्देश होता. सदरील सायकल वारीचे आयोजन एस.जी.जी.एस. फिटनेस क्लबचे प्रमुख डॉ. प्रभीर कार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सायकल वारीमध्ये डॉ. संजय कासराळीकर, डॉ. प्रदीप सोलंनकर, डॉ. अशोक कामठाणे, शिवाजी शिंदे, डॉ. संतोष बोमनाळे, डॉ. अमित अग्रवाल, प्रकाश कोमटवार, अभिजीत ठाकरे, प्रफुल्ल बच्चेवार, धनंजय पेनुरकर, श्री. सूर्या बडवणे तसेच डॉ. अंबादास कर्डीले आदींचा सहभाग होता. विशेषतः या सायकलस्वारांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी डॉ. प्रशांत देशमाने यांनी नांदेडहून प्रवास करून हदगाव येथे सायकलस्वारांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सर्व सायकल



स्वारांसाठी हायड्रेशनची विशेष व्यवस्था केली. त्यांच्या या सहकार्यामुळे सायकलस्वारांचा उत्साह अधिक वाढला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेली ही सायकल वारी फिटनेस, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जनजागृती यांचा सुंदर संगम ठरली.

# विभागीय निबंध स्पर्धेत शुभदा दरबस्तेवार प्रथम

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी येथील रहिवासी व धर्माबाद येथील राजाराम काकाणी विद्यालयात इयत्ता दहावीत शिक्षण घेणारी विद्यार्थिनी कु. शुभदा सुभाष दरबस्तेवार हिने स्व. शिवलाल राठी स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित विभागीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले.

दि.२४ जुलै रोजी विभागीय पातळीवर ही निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल १५ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आला. स्पर्धेत धर्माबाद, मुखेड, नांदेड, नायगाव, जिंतूर, सेनगाव, उमरखेड आणि छत्रपती संभाजीनगर यांसह एकूण नऊ केंद्रांवरून तब्बल १ हजार २७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे निबंधाचा विषय ऐनवेळी जाहीर करण्यात आला आणि विद्यार्थ्यांना अवघ्या एका तासात ४०० शब्दांचा निबंध लिहायचा होता. माझ्या स्वप्नातील २०४७ चा भारत हा विषय देण्यात आला होता. या आव्हानात्मक स्पर्धेत शुभदा दरबस्तेवार हिने आपल्या प्रभावी लेखनातून विभागात सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला. विभागीय स्तरावरील प्रथम क्रमांकाबद्दल शुभदाला प्रमाणपत्र तसेच ५ हजार १ रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. दि.१५ रोजी सायन्स कॉलेजच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात विजेत्या विद्यार्थिनीचा, तिच्यासोबत आलेल्या शिक्षकांचा तसेच आई-वडिलांचा सत्कार करून पुरस्कार प्रदान करण्यात आला. शुभदाच्या या यशाबद्दल शाळेचे संचालक सुबोध काकाणी, सुनील श्रीवास्तव, प्राचार्य सौरभ सक्सेना, उपप्राचार्या स्मिता शर्मा, उपप्राचार्य देशपांडे, मार्गदर्शक जगदीश दिकोंडवार यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२८२/२०२६
(CNR No.MHND100009822026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पद्मीनबाई देवराव मुपडे<br>रा.मंगलसांगवी ता.कंधार जि.नांदेड | वय ७० वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | अशोक देवराव मुपडे<br>रा.मंगलसांगवी ता.कंधार जि.नांदेड. हा.मु.रुम नं.११<br>इंद्रावती बिल्डींग,पोलीस कॉलोनी स्नेह नगर,नांदेड | वय ५३ वर्षे | धंदा-नौकरी |
| ३ | कुसूम भ्र.सुभाष मरदोडे<br>रा.जोशी सांगवी ता.लोहा जि.नांदेड | वय-४४ वर्षे | धंदा-घरकाम |

विरुद्ध - गैरअर्जदार - शाखा प्रबंधक नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.नांदेड शाखा चिखली, ता.कंधार जि.नांदेड

प्रकरण - अर्जदार यांना भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ नुसार वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे बाबत.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ३ यांचे वडिल नामे देवराव पि.केरबा मुपडे हे होते ते दिनांक ३१/०८/२०२५ रोजी मयत झाले आहे. अर्जदार क्र.१ चे सासू व सासरे पार्वतीबाई व केरबा मुपडे हे होते ते यापुर्वीच मयत झाले आहेत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत देवराव पि.केरबा मुपडे यांचे वारस असल्याबाबत गैरअर्जदार शाखा प्रबंधक नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.नांदेड शाखा चिखली, ता.कंधार जि.नांदेड यांच्या खाते क्र.१०३९११११११०२५५५ मध्ये रक्कम रुपये ६४,०२४/- (चौसस्ट हजार चोवीस रुपये) इतकी जमा आहे सदरील खात्यांमध्ये जमा असलेली रक्कम अर्जदार यांना मिळणेसाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत देवराव पि.केरबा मुपडे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - १५/०९/२०२६

आज रोजी दि.१०/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२९०/२०२६
(CNR No.MHND1000010032026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मनकर्णाबाई भ्र.आप्पाराव शिंदे | वय ७३ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | मीराबाई भ्र.आनंदा कदम | वय ५० वर्षे | धंदा-घरकाम |
| ३ | चक्रधर पि.आप्पाराव शिंदे | वय-४१ वर्षे | धंदा-शेती |
| ४ | श्रीधर पि.आप्पाराव शिंदे<br>वरील सर्व रा.मंगलसांगवी ता.कंधार जि.नांदेड | वय-३७ वर्षे | धंदा-नौकरी |
| ५ | विजयमाला साहेबराव मोरे<br>रा.देगाव ता.नायगाव खै.जि.नांदेड | वय-४७ वर्षे | धंदा-घरकाम |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ची पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडिल मयत नामे आप्पाराव पि.रावसाहेब शिंदे ही होती ती दिनांक ०६/०६/२०२६ रोजी मयत झाले आहे. तसेच अर्जदाराची आई अर्जदारांचे म्हणणे आहे की, आप्पाराव पि.रावसाहेब शिंदे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत आप्पाराव पि.रावसाहेब शिंदे यांचे वारस असलेबाबत शासकीय व निमशासकिय कार्यालयात मयताच्या वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत आप्पाराव पि.रावसाहेब शिंदे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - १६/०९/२०२६

आज रोजी दि.१३/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायालय क.स्तर लोहा ता.लोहा जि.नांदेड
यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज आर.जे.ई.क्र.९०/२०२६
सुरेश व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार : १) सुरेश पि.दिगांबर निळकंठे वय ४० वर्षे, धंदा मजुरी, रा.कलंबर (बु.) ता.लोहा जि.नांदेड, २) प्रतिभा पि.दिगांबर निळकंठे (लग्नापुर्वीचे नांव) प्रतिभा भ्र.आनंद शेळके (लग्नानंतरचे नांव) वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा.सुजलेगाव ता.नायगाव जि.नांदेड, ३) रेखा पि.दिगांबर निळकंठे (लग्नापुर्वीचे नांव) रेखा भ्र.सुर्यकांत वाघमारे (लग्नानंतरचे नाव) वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा.केशवनगर मुंडवा पुणे ता.जि.पुणे.

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

विषय : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार अर्जदाराच्या नावाने वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी श्री संतोष रंजिरे वकील, यांच्या मार्फत अर्ज केला आहे.

हे की, मयत नामे दिगांबर रानबा निळकंठे हे दिनांक १७/०५/२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयताचे अर्जदार क्र.१ मुलगा आणि अर्जदार नं.२ व ३ ह्या मुली आहेत. मयतास अर्जदारांशिवाय इतर कोणीही दुसरे कायदेशिर वारस नाहीत.

हे की, मयत नामे दिगांबर रानबा निळकंठे हे मौजे कलंबर (बु.) येथील रहिवाशी होते ते दि.१७/०५/२०२५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांना त्यांचे वारस म्हणुन मा.न्यायालयातून शासकिय व निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी अर्जदार यांना वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणाची काही आक्षेप असेल तर ती त्यांनी स्वतः किंवा वकीला मार्फत उपस्थित राहुन दिनांक ११/९/२०२६ सकाळी ११.०० वाजता लेखी आक्षेप दाखल करावा. अन्यथा अर्जदारांना नियमानुसार वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १३.८.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर,लोहा

# बारामतीत 'प्रेरणास्थान'चे पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

## खा.शरद पवारांची माहिती

पुणे:विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यासह समाजाला दिशा देणाऱ्या महापुरुषांच्या कार्याची आणि विचारांची माहिती देणारे प्रेरणास्थान उभारण्यात येणार आहे. विद्या प्रतिष्ठानच्या स्थापना दिनानिमित्त १६ ऑक्टोबर रोजी या वास्तूचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत करण्याचा विचार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली.

या प्रेरणास्थानात राजर्षी शाहू महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सयाजीराव गायकवाड, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, यशवंतराव चव्हाण आणि शारदाबाई पवार यांना स्थान देण्यात येणार आहे. त्यांच्या चित्रांसह जीवनकार्य, विचार आणि समाजासाठीचे योगदान यांची माहिती येथे उपलब्ध करून दिली जाणार आहे.महापुरुषांचे कार्य आणि विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचावेत, हा या प्रेरणास्थानामागील उद्देश असल्याचे पवार यांनी सांगितले. विद्यार्थ्यांसह नागरिकांना या व्यक्तिमत्त्वांच्या कार्याची माहिती मिळावी, यासाठी येथे विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी देशभर बारव, विहिरी आणि पाणवठे उभारून जनतेसाठी पाण्याची सुविधा निर्माण केली. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन जिरायती भागात बारव उभारण्याची संकल्पनाही मांडण्यात आली आहे. पाणीटंचाई असलेल्या भागात अशा जलसंधारणाच्या उपाययोजना करण्याचा विचार असल्याचे पवार यांनी सांगितले.

# शिवारफेरीतून गावाचा विकास आराखडा तयार करा:जिल्हाधिकारी कर्डिले



किनवट/प्रतिनिधी-प्रत्यक्ष फिरून शिवारफेरी पूर्ण करा,आपल्या गावाला काय हवं त्याचा आराखडा तयार करा, वनोपजाचे संरक्षण व विक्रीतून गावाला समृद्ध करा, रासायनिक खते व औषधी टाळून जीवामृत, दसपर्णी अर्क वापरा, खर्च कमी करून उत्पन्न वाढवा, गट शेती करा ,सामूहिक वनसंपत्तीचे नियोजन, जैवविविधतेचे संवर्धन, लघुवनोपजाचे व्यवस्थापन, पारंपरिक ज्ञानाचा वापर आणि शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून घेणे हेच आजच्या कार्यशाळेचं फलित आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी वनहक्कांची मान्यता अधिनियम, २००६, नियम २००८ व सुधारित नियम २०१२ यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या सामूहिक वनहक्क अंमलबजावणी व व्यवस्थापन समिती प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय यांच्यावतीने पंचायत समिती सभागृहात प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी बी.सरवनन, तहसीलदार डॉ.शारदा चौंडेकर, गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे यांची प्रमुख उपस्थिति होती. पुढे बोलतांना जिल्हाधिकारी कर्डिले असे म्हणाले की, निसर्गातील जीवसृष्टीची विविधता म्हणजे जैवविविधता होय. किनवट परिसरातील जंगले, बांबू, साग, विविध औषधी वनस्पती, वाघ, बिबट्या, अस्वल, लांडगा, हरीण, मोर, विविध पक्षी व कीटक हे सर्व मिळून त्या परिसराची जैवविविधता तयार करतात. तेव्हा याची जपणूक झाली पाहिजे. याप्रसंगी पांढरकवडा येथील उमेद संस्थेचे सचिव अमीत कुलकर्णी यांनी ग्राम सभा सक्षमीकरण, गडचिरोली येथील सृष्टी संस्थेचे संयोजक केशव गुरनाळे यांनी आर्थिक सक्षमीकरण, यवतमाळ येथील जिल्हा व्यवस्थापक रुपेश श्रृपवार यांनी वन हक्क कायदा जनजागृती, सहायक बालाजी नरवाडे यांनी वनहक्क कायदा, वन परिक्षेत्राधिकारी धीरज मदने यांनी वन संरक्षण व संसाधन व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. आदी उत्तम कानिंदे यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन केले व आभार मानले.याप्रसंगी सहायक प्रकल्पाधिकारी प्रदीप नाईक विस्तार अधिकारी (पं) कैलास गायकवाड, जिल्हा कन्व्हर्जन समिती सदस्य तुकाराम पेंदोर, गजानन डवरे, देवगिरी कल्याण आश्रम जळगावचे प्रांत उपाध्यक्ष डॉ.उत्तम धुमाळे, जिल्हा सचिव विश्वनाथ नखाते सामाजिक कार्यकर्ते विजय पवार, वनपाल मनोज गुरसाळी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी वनहक्क तालुका व्यवस्थापक महेश राठोड व आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे गणेश कटकमवार यांनी परिश्रम घेतले.

# उमरखेडमध्ये 'त्रिमूर्ती सरकार' फेल ? ;आठ महिन्यात विकास शून्य

## नगर परिषदेत टक्केवारीचा कारभार-विरोधी पक्षनेते हरडपकर यांचा आरोप

उमरखेड/प्रतिनिधी-नगर परिषदेत जनशक्ती पॅनलच्या त्रिमूर्ती सरकारला ८ महिने पूर्ण झाले, मात्र आरोग्य, बांधकाम, पाणीपुरवठा, शिक्षण, महिला व बालकल्याण या पाचही समित्यांच्या सभापतींना कोणताही आर्थिक किंवा प्रशासकीय अधिकार नसल्याने सर्व विकासकामे ठप्प झाली आहेत. 'दोन भाऊ एक साहेब' च्या मनमानीमुळे कर्मचारी संभ्रमात असून नगर परिषदेत सावळा गोंधळ सुरू असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय हरडपकर यांनी उमरखेड येथील शासकीय विश्रामगृहावर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे.

न.पा.शिक्षण विभागावर आरोप करताना त्यांनी सांगितले की,शाळेच्या पटावर बोटावर मोजण्याइतके विद्यार्थी असताना ९९ अतिरिक्त कंत्राटी शिक्षक भरून न.प. फंडावर ७० लाखांचा बोजा टाकला आहे. शासनाकडे मागणी न करता अर्धे तुम्ही अर्धे आम्ही तत्वावर भरती सुरू आहे. शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या, मुले जमिनीवर बसतात आणि सत्ताधारी सीसीटीव्ही, डिजिटल बोर्डवर वायफळ खर्च करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. याशिवाय शहरात गढूळ पाणीपुरवठा होत असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. क्लोरीन, तुरटी खरेदीतही गैरव्यवहाराचा आरोप विरोधकांनी केला आहे. गेल्या ८ महिन्यात एकही नवे काम मंजूर झाले नसून प्रशासकीय काळातील रस्त्यांवर ५ लाखाचे मुरुम काम टेंडरशिवाय कार्यकर्त्यांना पोसण्यासाठी दिल्याचा आरोप त्यांनी केला आहे. याशिवाय विविध विभागात भरमसाठ भरती करून नगर परिषदेचे रोजगार दुकान सुरू आहे. पुराव्यानिशी जिल्हाधिकाऱ्यांकडे अनेक तक्रारी देऊनही मुख्याधिकारी गप्प असून स्वीकृत नगरसेवक एफआयआरची धमकी देत असल्याचा आरोपही विरोधकांनी या वेळी केला.

### विद्यार्थ्यांचे हित सर्वोच्च

नगर परिषदेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि शिक्षकांची कमतरता भासू नये म्हणून नियमानुसारच आवश्यक पावले उचलण्यात आली आहेत. नगर परिषद अधिनस्थ चार हजार एकशे सत्तावीस विद्यार्थी आहे शासनाकडे वारंवार शिक्षकाची मागणी करून देखील शिक्षक मिळत नाही परिणामी कंत्राटी शिक्षक भरती शिवाय पर्याय नाही विषेश म्हणजे उमरखेड शहर विकास आघाडी (भाजप प्रणित) च्या काळापासून व प्रशासक काळात ही कंत्राटी शिक्षकाची भरती निरंतर सुरु आहे. डिजिटल शिक्षण शाळांमध्ये डिजिटल बोर्ड आणि सुरक्षेसाठी सीसीटीव्ही लावणे हा निधीचा गैरवापर नसून नगर परिषदेच्या शाळांना आधुनिक बनवण्याचा प्रयत्न आहे.

**- रसूल पटेल,** शिक्षण सभापती
नगर परिषद उमरखेड.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा दौरा

नांदेड/प्रतिनिधी-केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण



राज्यमंत्री रामदास आठवले हे नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे राहील.

बुधवार १९ ऑगस्ट २०२६ रोजी परभणी जिल्ह्यातील पुर्णा येथून दुपारी ३ वा. वाहनाने नांदेडकडे प्रयाण. दुपारी ३.३० वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक व मनपा आयुक्त यांच्यासमवेत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यासोबत बैठकीस उपस्थिती. स्थळ- शासकीय विश्रामगृह नांदेड. दुपारी ४ वा. शासकीय विश्राामगृह नांदेड येथे पत्रकार परिषदेस उपस्थिती. दुपारी ४.३० वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथून वाहनाने उमरखेड जि. यवतमाळकडे प्रयाण करतील.

# विनोद तावडे यूपीचे प्रभारी

नवी दिल्ली:भाजपने संघटनात्मक फेरबदल करत राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची उत्तर प्रदेशच्या राज्य प्रभारीपदी नियुक्ती केली आहे. २०२७ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. पक्षाने यासोबतच तरुण चुग यांच्याकडे गुजरात, तर सतीश पुनिया यांच्याकडे पंजाबची जबाबदारी सोपवली आहे.

तावडे यांनी यापूर्वी हरियाणा व बिहारचे प्रभारी म्हणून काम पाहताना संघटन मजबूत करण्यासह निवडणूक रणनीतीत महत्त्वाची भूमिका बजावली. २०२२ च्या राष्ट्रपतीपद निवडणुकीत द्रौपदी मुर्मू यांच्या निवडणूक व्यवस्थापनात तसेच २०२५ च्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत सी. पी. राधाकृष्णन यांच्या निवडणूक व्यवस्थापनात त्यांनी समन्वयाची जबाबदारी पार पाडली.भाजपच्या राष्ट्रीय सदस्यता अभियानाचे प्रभारी म्हणूनही त्यांनी काम केले. उत्तर प्रदेशातील संघटनात्मक निवडणुका, विविध राज्यांतील विधानसभा निवडणुका तसेच पक्षाच्या राष्ट्रीय मोहिमांच्या समन्वयात त्यांचा सहभाग राहिला आहे.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ता योजना समितीवर जगदीश रेड्डी नलमेलवार

मांडवी/प्रतिनिधी-शिरपूर गावचे माजी उपसरपंच मनमिळावू स्वभावाचे जगदीश रामारेड्डी नलमेलवार यांची आ.भीमराव केराम यांच्या शिफारसीवरून मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ता योजना समितीवर अशासकीय सदस्य म्हणून निवड झाली.



जगदीश नलमेलवार हे तीस वर्षापासून भाजपचे कट्टर कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. आ.भिमरावजी केराम यांचे निकटवर्तीय कार्यकर्ते असून जुन्या कार्यकर्त्यांच्या कार्याची जाणीव ठेवून आ. भीमरावजी केराम यांनी न्याय दिला आहे.त्यांची निवड झाल्याने समितीचे सह अध्यक्ष बाबुराव केंद्रे, भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते अविनाश राठोड, बजरंगरेड्डी सिंगडवार, संजीवरेड्डी येल्टीवार, नवीन राठोड, रमेश बद्दीवार, गजानन बंडेवार, शेखर एलटीवार प्रवीण श्रीमनवार, मोहन पांडेवार, विनोद अडडीवार, सरपंच सिताराम गेडाम, गजानन भुरे, सुरेश सावंगेकर, केशवरेड्डी येल्टीवार, संतोष चांदेकर, गणेश उईके, पुरुषोत्तम पेंदोर, पल्लू नाईक, नामदेव वाडगुरे, देवराव वाघाडे, विनोद सकवान, श्रीनिवास चुकलवार, स्वामी गौड, नरसोबा सुरपाम, तुळशीराम कुडमिते, पवन जयस्वाल, मनीष राठोड, दासू गाउत्रे, राहुल ओसावार, गजू बावणे, पुंडलिक गेडाम, मनोज नंदीकोंडावार,इत्यादीसह अनेक भाजप कार्यकर्त्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
नांदेड यांच्या न्यायालयात
Civil M.A.No.1205/2026
CNR Number : MHND020023792026

अर्जदार : १) महेंदर कौर जगिंदर सिंघ नालेवाल, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा.फतेह निवास, अनुराधा पॅलेस जवळ, हिंगोली गेट, नांदेड, २) रतनजीत कौर जसवंतसिंघ सुखमनी, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा.घर नं.३-३-५७४, रामदास नगर, शहीद भगतसिंग रोड, नांदेड, ३) परीतपालसिंग जोगिंदरसिंग नालेवाले, वय ४४ वर्षे, धंदा व्यवसाय, रा.घर नं.३-३-८७५, फतेह निवास, हिंगोली गेट, गुडगिला पेट्रोल पंप जवळ, नांदेड, ४) दयाल कौर ठाकूर सिंघ सुखमनी, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा.घर नं.३-६-२१८, गुरुद्वारा गेट नं.४, गुरुद्वारा जवळ, बडपुरा, शहीदपुरा, नांदेड, ५) पवनजीत कौर दिलबाग सिंघ गडगज, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा.घर नं.३-३-१६०, सरदार निवास, उदासी मठ, चिखलवाडी, नांदेड, ६) दर्शनसिंघ जोगिंदरसिंघ नालेवाले, वय ३४ वर्षे, धंदा व्यवसाय, रा.फतेह निवास, हिंगोली गेट,नांदेड.

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेगुलेशन कायदा VIII च्या १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाण पत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ या मयताच्या पत्नी असून अर्जदार क्र.२ ते ६ हे मयताचे मुली व मुलगे आहेत. मयत जगिंदर सिंघ पि.गंगन सिंघ नालेवाले हे नांदेड येथील रहिवासी होते व त्यांचा मृत्यू दिनांक १०/०४/२०२५ रोजी अपेक्षा हॉस्पिटल, रेल्वे स्टेशन रोड, नांदेड येथे झाला आहे.

मयत नामे जगिंदर सिंग गंगन सिंग यांना अर्जदार क्र.१ ते ६ यांच्याशिवाय इतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांनी नमूद केले आहे. तसेच मयताने कोणतेही मृत्युपत्र अथवा कोडिसिल केलेले नाही. अर्जदार क्र.१ ते ६ यांनी वारस हक्क प्रमाणपत्र मिळविण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील अर्जदारांना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही हरकत किंवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत तीस (३०) दिवसांच्या आत अथवा दिनांक ०३/१०/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहावे, अन्यथा अर्जदारांच्या बाजूने योग्य तो निर्णय देण्यात येईल याची सर्व जबाबदारी संबंधितांवर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझ्या सही व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपीक
३ रे सह दिवाणी न्यायालय
व.स्तर,नांदेड

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
नांदेड यांच्या न्यायालयात
Civil M.A.No.1149/2026
CNR Number : MHND020022922026

अर्जदार : १) जरीना बी शेख चांदपाशा वय ८३ वर्षे, धंदा घरकाम, रा.घर नं.९-२-१२६, ब्रह्मपुरी, चौफाळा, इतवारा,नांदेड, २) शेख जावीद शेख चांदपाशा वय ४५ वर्षे, धंदा ऑटो ड्रायव्हर रा. घर नं.९-२-१२६, ब्रह्मपुरी मस्जिद जवळ, चौफाळा, इतवारा, नांदेड, ३) शेख वाजीद शेख चांद वय ३६ वर्षे, धंदा वेल्डर रा. ब्रह्मपुरी, खदीम मस्जिद जवळ, इतवारा,नांदेड, ४) इरफाना बेगम भ्र. मुख्तार बेग @ इरफाना बेगम पि.शेख चांद पाशा वय ४५ वर्षे, धंदा घरकाम रा. घर नं.९-२-१२६, ब्रह्मपुरी, चौफाळा, इतवारा,नांदेड, ५) आफरीन बेगम भ्र.शेख गाउस @ आफरीन बेगम पि.शेख चांद पाशा वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा.घर नं.९-२-१२३, ब्रह्मपुरी, चौफाळा, इतवारा,नांदेड मो.८२०८९६०६२६

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेगुलेशन कायदा VIII च्या १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाण पत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ या मयताच्या पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ हे मयताचे मुलगे आणि अर्जदार क्र.४ व ५ या मयताच्या मुली आहेत. मयत शेख चांद पाशा पि.घुडू साहब, रा.घर नं.९-२-१२६, ब्रह्मपुरी, चौफाळा, इतवारा, नांदेड येथील रहिवासी होते. त्यांचे दिनांक ०६-०८-२०२३ रोजी शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड येथे निधन झाले आहे.

मयत नामे शेख चांद पाशा पि.घुडू साहब, यांना अर्जदार क्र.१ ते ५ यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत, असे अर्जदारांनी नमूद केले आहे. तसेच मयताने कोणतेही मृत्युपत्र अथवा कोडिसिल केलेले नाही. अर्जदार क्र.१ ते ५ यांनी वारसहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील अर्जदारांना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही हरकत किंवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत तीस (३०) दिवसांच्या आत अथवा दिनांक २९/०९/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहावे, अन्यथा अर्जदारांच्या बाजूने योग्य तो निर्णय देण्यात येईल याची सर्व जबाबदारी संबंधितांवर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझ्या सही व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपीक
३ रे सह दिवाणी न्यायालय
व.स्तर,नांदेड

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२९३/२०२६
(CNR No.MHND1000010212026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कंठीराम विठ्ठल गर्जे | वय-७९ वर्षे | धंदा-मजुरी |
| | सर्व रा.बहादरपुरा ता.कंधार जि.नांदेड | | |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडिल मयत नामे विठ्ठल कंठीराम गर्जे ही होती ती दिनांक १९/०९/२०१६ रोजी मयत झाले आहे. तसेच अर्जदाराची आई यापुर्वीच मयत झाली आहे. तसेच अर्जदाराची आई अर्जदारांचे म्हणणे आहे की, विठ्ठल कंठीराम गर्जे यांचे अर्जदारा शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना विठ्ठल कंठीराम गर्जे यांचे वारस असलेबाबत शासकीय व निमशासकिय कार्यालयात मयताच्या वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत विठ्ठल कंठीराम गर्जे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-१६/०९/२०२६

आज रोजी दि.१३/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

पान १ वरुन

### अल्पवयीन अंध मुलीचा...

आहेत. शवविच्छेदन अहवाल आणि तपासातूनच मृत्यूचे नेमके कारण तसेच लैंगिक अत्याचाराच्या आरोपातील सत्यता स्पष्ट होणार आहे. अल्पवयीन आणि दिव्यांग विद्यार्थिनींच्या सुरक्षेबाबत या घटनेने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. निवासी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी होते का, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष, सखोल आणि पारदर्शक चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.

### राज्यावर दुष्काळाचे सावट...

मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड आणि लातूर जिल्ह्यांत पावसाची तूट कायम आहे. खरीप पिकांना सध्या पावसाची नितांत आवश्यकता असताना अपेक्षित पाऊस होत नसल्याने शेतकऱ्यांचे लक्ष आकाशाकडे लागले आहे. सप्टेंबरमध्येही पाऊस सरासरीपेक्षा कमी राहिल्यास शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे.विदर्भातील अनेक जिल्ह्यांतही मोठ्या पावसाचा जोर कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे लक्ष आकाशाकडे लागले आहे.कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांतही सध्या मोठ्या पावसाचा इशारा नाही. काही ठिकाणी हलक्या सरींची शक्यता असली तरी बहुतांश भागांत हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे.सप्टेंबरमध्येही अपेक्षित पाऊस न झाल्यास खरीप उत्पादनासह ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने पावसाच्या स्थितीवर लक्ष ठेवून संभाव्य पीक नुकसान आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### सुप्रिम कोर्टाचे याचिकाकर्त्यांना...

याचिकाही दाखल करण्यात आली. मात्र, निवडणूक प्रक्रिया अपेक्षित पद्धतीने पुढे न गेल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.सर्वोच्च न्यायालयाने आता उच्च न्यायालयात नव्याने कायदेशीर उपाय अवलंबण्याची मुभा देत, अशी याचिका दाखल झाल्यास तिचा कायद्यानुसार विचार करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे तख्त सचखंड श्री हजूर साहिबच्या व्यवस्थापनातील निवडणूक आणि लोकशाही प्रक्रियेचा प्रश्न पुन्हा उच्च न्यायालयासमोर जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अ‍ॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४